# पोमसं यांचे स्थायी आदेश क्र.

**राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येणार आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय कार्यासन क्र.6 यांना तात्काळ सादर करावेत. तसेच पोलीस कर्मचा-यांची प्रतिक्रिया कळवावी.**

क्र.पोमसं/6/10/पो.शि.भरती -सेवाज्येष्ठता /251/2012.   मुंबई   दिनांक :-२८/०१/२०१३

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार पोलीस शिपाई कर्मचा-यांची भरतीद्वारे नियुक्ती करण्यात येते. सद्यःस्थितीत पोलीस शिपाई या संवर्गाची सेवाज्येष्ठता ही भरतीद्वारे नियुक्तीस पात्र ठरलेला उमेदवार पोलीस मुख्यालयात/ नियुक्तीवर हजर होईल त्या दिनांकानुसार निश्चित करण्यात येते. तसेच, पोलीस भरती दरम्यान एखाद्या उमेदवारास जास्त गुण प्राप्त असून देखील तो विहीत मुदतीत पोलीस शिपाई पदाच्या नियुक्तीवर हजर न झाल्यास त्याची पोलीस शिपाई पदातील सेवाज्येष्ठता ही त्याच्या सोबतच्या भरतीच्या तुकडीतील शेवटच्या उमेदवाराच्या नावाच्या खाली लावण्यात येते. तसेच पोलीस शिपाई यांना देण्यात येणा-या प्रशिक्षणा दरम्यान त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार त्यांची सेवाजेष्ठता ठरविण्याचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्यामुळे, पोलीस शिपाई पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांची सेवाजेष्ठता तसेच, आंतरिक सेवाज्येष्ठता (interse seniority) निश्चित करण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

**[अ]** पोलीस भरतीच्या वेळी घेण्यात येणा-या परिक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेले एकुण गुण, अधिक त्यानंतर पोलीस शिपाई पदाच्या मुलभूत प्रशिक्षणाच्यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्रातील अंतिम परिक्षेत त्याने प्राप्त केलेले एकुण गुण, हया दोन्ही गुणांची बेरीज करुन, त्या एकुण गुणांच्या गुणवत्तेच्या क्रमांनुसार पोलीस शिपाई या संवर्गातील कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यापुढे लावण्यात यावी.

**[ब]** तसेच, अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई पदावर भरती होणा-या उमेदवारांच्या बाबतीत भरतीच्यावेळी त्यांची परिक्षा घेण्यात येत नसल्याने ते मुलभुत प्रशिक्षण घेत असलेल्या तुकडी सोबतच्या उमेदवारांच्या खाली आणि त्यांनी पोलीस शिपाई पदाच्या मुलभुत प्रशिक्षणाच्या वेळी पोलीस प्रशिक्षण केंद्रातील अंतिम परिक्षेत प्राप्त केलेल्या अंतिम गुणांच्या क्रमवारीनुसार अनुकंपा तत्त्वावर पोलीस शिपाई पदावर भरती होणा-या उमेदवारांची सेवाज्येष्ठता लावण्यात यावी.

**[क]** सदरचे स्थायी आदेश हे सन 2013 च्या पुढील पोलीस शिपाई पदाच्या भरतीपासून अंमलात येतील.

प्रति,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे/ नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे/ नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / बिनतारी संदेशसह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.1 ते 16.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
पोलीस अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

2/- हे ज्ञापन mahapolice gov.com. या वेबसाईटवर दि. 21/01/2013 ते 28/02/2013 या कालावधीमध्ये प्रकाशित (flash) करण्यात यावेत.

प्रत माहितीकरिता :-

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग., महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती दल, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, नक्षल विरोधी अभियान, म.रा., नागपूर.
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे /राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई/ वाहतुक, मुंबई/ लोहमार्ग, म.रा., मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, म.पो.अ., नाशिक / म.गु.प्र.पुणे/बिनतारी संदेश विभाग, म.राज्य. पोलीस बल, पुणे.